# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

## सुरक्षा रक्षक (Guards) करिता सुधारित बंधपत्र

Dtd. 13/3/2023

## अटी व शर्ती

***महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामध्ये भरती होऊन प्रशिक्षणाकरिता हजर झालेल्या प्रशिक्षणार्थी यांच्या माहितीसाठी महामंडळातील सेवा व इतर बाबी विषयक खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना व माहिती देण्यात येत आहे.***

1) महामंडळातील सुरक्षा रक्षकांची (Guards) सेवा ही 11 महिन्याची कंत्राटी तत्वावरील सेवा आहे. सदरची कंत्राटी सेवा ही विविध आस्थापनाकडून महामंडळाकडे केलेल्या मागणीनुसार विविध आस्थापनांना सुरक्षा रक्षक सेवा देण्यात येते.

2) सुरक्षा रक्षक सेवा ही कंत्राटी स्वरूपाची असल्यामुळे ती भविष्यात कायमस्वरूपी होणार नाही व या प्रकारची मागणी देखील सुरक्षा रक्षकाला करता येणार नाही, याची आपण नोंद घ्यावी.

3) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अधिनियम 2010 नुसार या महामंडळाची स्थापना झाली असून सदर अधिनियमातील सर्व तरतुदी सुरक्षा रक्षकांवर बंधनकारक आहेत. त्यामधील तरतूदीनुसार आपणास police Forces (Restriction of Right) Act, 1966 मधील सर्व नियम व तरतुदी बंधनकारक आहेत. त्यामुळे महामंडळाच्या सेवेत असताना आपणास कोणत्याही संघटनेचा उदा. राजकीय, कामगार, व्यापारी इ. संघटनेचा (Union) सदस्य होता येणार नाही अथवा संघटना स्थापन करता येणार नाही. तसेच इतर कोणत्याही संघटनेच्या कसल्याही प्रकारच्या कारवायांमध्ये भाग घेता येणार नाही.

4) सुरक्षा रक्षकांची (Guards) नियुक्ती पोलीस विभागाकडील चारित्र्य पडताळणी अहवालाच्या व वैद्यकिय चाचणी अहवालाच्या अधीन आहे. प्रशिक्षण दरम्यान किंवा तद्नंतर चारित्र्य पडताळणी अहवाल आणि किंवा वैद्यकिय चाचणी अहवाल अक्षेपार्ह असल्याचे आढळून आल्यास त्याचप्रमाणे विहित वेळेत पोलीस चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त न झाल्यास आपणास कंत्राटी सेवा दिली जाणार नाही किंवा दिली असल्यास रद्द करण्यात येईल.

5) सुरक्षा रक्षकांना (Guards) निवासस्थान अथवा अन्य भत्ते (TA/DA) अनुज्ञेय नाहीत.

6) महामंडळाशी केलेल्या कंत्राटी करारानुसार आपणास राज्यातील कोणत्याही भागात (युनिटमध्ये/ जिल्हा/शहर/गांव/कार्यालयात) नियुक्ती दिली जाईल. अशी नियुक्ती दिल्यानंतर 11 महिने करार कालावधीत त्यांची बदलीसाठी विनंती विचारात घेतली जाणार नाही.

7) आपणाकडुन प्रशिक्षण कालावधीत सिक्युरिटी डिपॉझिट रु.10,000/- (रु.5000/- (Non-refundable) आणि रु.5000/- (Refundable) इतकी रककम घेण्यात येईल.

अ) उमेवारांने प्रशिक्षण सुरु झाल्यापासून 7 दिवसाच्या आत प्रशिक्षण सोडल्यास, 1) प्रतिदिनी प्रशिक्षण शुल्क खर्च रक्कम, 2) इतर खर्च (पीटी किटस/गणवेष इ. मंडळाकडून पुरवठा केला असल्यास त्याचा खर्च) त्याचप्रमाणे, 3) प्रती दिवस रु.100/-प्रमाणे दंड इ. एकत्रित करून सिक्युरिटी डिपॉझिट मधुन वजा करण्यात येवून उर्वरित रक्कम अदा करण्यात येईल.

ब) तसेच,उमेदवारांने प्रशिक्षण सुरु झाल्यापासून 7 दिवसानंतर प्रशिक्षण सोडल्यास, उमेदवारास सिक्युरिटी डिपॉझिट मधील कोणतीही रक्कम अदा केली जाणार नाही.

क) प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर आपणास आस्थापनेच्या मागणीनुसार आवश्यकतेप्रमाणे महामंडळाकडून कर्तव्यावर बोलाविण्यात येते. कर्तव्यावर हजर झाल्यानंतर पहिला कंत्राटी कालावधी यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर आपणास एक रक्कमी Refundable Security Deposit रु.5000/-वेतनातून अदा करण्यात येईल.

ड) प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर कर्तव्यावर नेमणुकीस बोलाविण्यात येते. त्यावेळी कर्तव्यावर हजर न झाल्यास आपणाकडून घेण्यात आलेली Refundable Security Deposit रु.5,000/- इतकी रक्कम परत करण्यात येणार नाही. तसेच प्रशिक्षणाच्यावेळी प्रशिक्षणासाठी करण्यात आलेला खर्च आपणाकडून वसुल केला जाईल.

8) सुरक्षा रक्षक (Guards) म्हणून सेवेत असतांना अथवा सेवा संपल्यानंतर महामंडळाशी संबंधित कोणतीही गोपनीय माहिती देता येणार नाही. या अटीचे उल्लंघन केल्यास प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे करारसेवा देखील खंडीत करण्यात येईल.

9) सुरक्षा रक्षकाने (Guards) प्रशिक्षण केंद्रावर हजर होताना त्याचप्रमाणे प्रत्येक्षात सुरक्षा रक्षक सेवा दिल्यानंतर आधार कार्ड व पॅन कार्डच्या सांक्षाकीत प्रती महामंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे, जेणेकरून मासिक वेतन, भत्ते काढण्यास भविष्यात कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत.

10) सुरक्षा रक्षकाची (Guards) सेवा ही महामंडळाच्या अस्तित्वात असलेल्या व भविष्यात तयार होणाऱ्या नियम व आदेशांच्या अधिन असेल.

## ***प्रशिक्षण कालावधीत मार्गदर्शक सूचना***

11) **सुरक्षा रक्षका करिताचे (Guards) मुलभूत प्रशिक्षण हे 45 दिवसाचे आहे. प्रशिक्षणादरम्यान कोण्तीही रजा तसेच वेतन/मानधन अनुज्ञेय राहणार नाही. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थीच्या जेवणाचा संपूर्ण खर्च महामंडळातर्फे देण्यात येईल.** प्रशिक्षण देताना Security Deposit व्यतिरिक्त कोणताही आकार घेतला जाणार नाही.

12) प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षण केंद्र प्रमुख यांचे आदेश व नियमांचे काटकोर पालन करणे आवश्यक आहे.

13) प्रशिक्षणासाठी हजर झाल्यानंतर प्रशिक्षणार्थींस अ) कायमस्वरुपी शारिरीक जखम झाल्यास किंवा ब) कोणतीही कौटुंबिक आपत्कालीन परिस्थिती जसे कुटुंबातील व्यक्तीचे निधन किंवा नैसर्गिक आपत्ती या कारणाशिवाय प्रशिक्षण अर्धवट सोडुन गेले असल्यास त्यांना प्रशिक्षणासाठी हजर करून घेतले जाणार नाही त्यांची नावे निवड यादीतून कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल. तसेच भविष्यात सदर उमेदवारांस महामंडळाच्या कोणत्याही सेवेमध्ये सामील केले जाणार नाही.

14) प्रशिक्षणादरम्यान फक्त रविवारी सुट्टी असेल तथापि, प्रशिक्षण केंद्र सोडुन जाता येणार नाही.

..2/-

15) प्रशिक्षणादरम्यांन कोणत्याही प्रशिक्षणार्थीने इतर प्रशिक्षणार्थी/ट्रेनर/वस्ताद/महामंडळाचे सदस्य/महिला/ परिसरातील व्यक्ती यांच्याशी गैरवर्तणुक/असभ्य वर्तन/भांडण/जुगार खेळणे/दारु पिणे या सारख्या महामंडळाच्या प्रतिष्ठेस बाधा आणणरी कृती केल्यास प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण खंडीत करून प्रशिक्षणार्थीला कमी करण्यात येईल व केलेली कृती गैरकायदेशिर असल्यास कायदेशीर कारवाई देखील करण्यात येईल.

16) सुरक्षा रक्षक (Guards) पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांना विहित वेळेत व दिनांकास संबंधित प्रशिक्षण संस्थांमध्ये हजर राहणे बंधनकारक आहे.

17) प्रशिक्षण केंद्रामध्ये हजर झाल्यानंतर प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीत खालील पी.टी.साहित्य प्रशिक्षणार्थींनी स्वत: खरेदी करावयाचा आहे व त्यासाठी महामंडळाने निश्चित केलेला पीटी किट्स भत्ता रु.1450/- इतका हा प्रत्यक्ष नियुक्ती दिल्यानंतर दुसऱ्या महिना पुर्ण झाल्यावर वेतन खात्यात जमा केला जाईल.

1. खाकी हाफ पॅन्ट (दोन नग) - पुरुष प्रशिक्षणार्थी
2. पांढरा पी.टी टी शर्ट (दोन नग) - पुरुष प्रशिक्षणार्थी
3. ब्लॅक सॉक्स (दोन जोडी) - पुरुष प्रशिक्षणार्थी
4. ब्लॅक पी.टी शूज (एक जोडी) - पुरुष प्रशिक्षणार्थी

त्याचप्रमाणे, प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर सुरक्षा रक्षक पदावर नेमणुक झाल्यानंतर खालील गणवेष साहित्य प्रशिक्षणार्थीनी स्वत: खरेदी करावयाचा आहे व त्यासाठी महामंडळाने निश्चित केलेला गणवेष भत्ता दिला जाईल.

1. Elite forces च्या धर्तीवर Polyester Viscos-Bottle Camouflage पध्दतीचा खाकी रंगाचा गणवेष (शर्ट +पॅण्ट + कॅप)
2. गणवेषावरील कमरेचा नॉयलॉन बेल्ट
3. गणवेषावरील शूज
4. गणवेषावरील व्हिसल कॉर्डसह

18) प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीत केवळ शासकीय परिक्षांनांच बसण्यास परवानगी देण्यात येईल. इतर कोणत्याही परिक्षांसाठी परवानगी देण्यात येणार नाही.

19) प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षणार्थीनी इस्त्री, हिटर, स्टिमर किटली, टोस्टर,स्टेरिओ आदि इलक्ट्रॉनिक उपकरणे सोबत आणू नयेत. तसेच प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण कालावधीत मौल्यवान /किमती वस्तू (दागदागिने, महागडे गॉगल्स, वाहने, महागडे घडयाळ इ.) सोबत बाळगू नयेत.

20) प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाचे कालावधीत मैदानावर /लेक्चर हॉल मध्ये मोबाईल फोन वापरण्यास बंदी राहील. आंतरवर्ग प्रशिक्षणाकरीता सर्व प्रशिक्षणार्थींनी स्वत:चे नोटबुक, पेन इ. साहित्य घेवून येणे.

21) प्रशिक्षण काळामध्ये प्रशिक्षणार्थींनी शक्यतो स्वत:चे विवाह आयोजित करू नये. प्रशिक्षणानंतर विवाह कार्यक्रम ठेवावे. जर धार्मिक अथवा इतर टाळता न येणाऱ्या कारणासाठी विधी करणे अत्यावश्यक असेल अशा प्रकरणात रविवार जोडून एक दिवस रजा देण्यात येईल.

22) प्रशिक्षण काळामध्ये केवळ आई-वडील/पत्नी-पती/मुलगा-मुलगी (First blood Relationship) यांचे मृत्यु/गंभीर आजारपणासाठीच रजा देणेबाबत विचार करण्यात येईल. आजी-आजोबा, काका-काकू, मामा-मामी,आत्या-मावशी यासारखे इतर नातेवाईकांचे आजारपण व लग्नसोहळयांकरिता रजा देण्यात येणार नाही.

23) प्रशिक्षण कालावधीत अपवादात्मक परिस्थिती वगळता कोणत्याही प्रकारच्या रजा देय नाहीत. प्रशिक्षण कालावधीत 1 दिवसांची विनापरवाना गैरहजेरीसुध्दा शिस्तभंग विषयक कार्यवाहीस कारणीभूत ठरू शकते.

24) प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या उमेदवारांना प्रशिक्षणाअंती आंतरवर्ग व बाहयवर्ग परिक्षा दयावी लागेल. परिक्षा उतीर्ण होणाऱ्या प्रशिक्षणार्थींची गुणानुक्रमे निवड सुची (Merit list) तयार करण्यात येईल. या निवड सुची प्रमाणेच प्रशिक्षणार्थींना सेवेत घेण्यात येईल.

25) प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींनी नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणास हजर झाल्यानंतर त्यांना नियम समजावून सांगण्यात येतील.

26) सदर मार्गदर्शक सूचना व मार्गदर्शक सुचनांसोबतची सहपत्रे www.mahasecurity.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

**पोलीस अधिक्षक तथा**
**महाव्यवस्थापक (आस्थापना/प्रतिष्ठापना/अभियान)**
**अति.कार्यभार (प्रशिक्षण व भरती)**
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ,मुंबई.

वरील सर्व सूचना मी वाचून पाहिल्या. त्या मला मान्य आहेत. वरीलपैकी कोणत्याही सूचनेचे उल्लंघन केल्यास मी कायदेशीर तसेच अनुषांगिक कार्यवाहीस पात्र राहीन.

उमेदवाराचे संपूर्ण नाव -
आधारकार्ड नं.
मोबाईल नं.
दिनांक :

(उमेदवाराची स्वाक्षरी)